# रयत शिक्षण संस्थेचे,
# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग २०२०-२१

## मराठी राजभाषा दिन

<u>अहवाल</u>

दि.०३/०३/२०२१

दि.२७ फेब्रुवारी हा दिवस सर्वत्र 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा केला जातो. या मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचा मराठी विभाग आणि सकाळ मध्यम समूहाचे यिन यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध कवी मा.रोहित शिंगे यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मराठी विभाग प्रमुख प्रा.बी.बी.जाधव यांनी केले. तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.बी.बी.घुरके यांनी करून दिला.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून विशेष सत्कार करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाचे प्रा.डॉ.बी.बी.घुरके यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल तर कु. मानसी कुंचकोरवी हिचा यिन अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये मा. अवधूत गायकवाड यिन समन्वयक यांनी मार्गदर्शन केले. कवी रोहित शिंगे यांच्या कवितेने उपस्थित लोकांना भारावून टाकले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी मा.प्राचार्य डॉ.एस.टी.साळुंखे हे होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर नियमांचे काटेकोरपणे पालन करून हा कार्यक्रम घेण्यात आला.

CHHATRAPATI SHAHU ... KOLHAPUR

प्रमुख, मराठी विभाग